# मुंबई प्रांतातील समाज सुधारक चळवळीस पंडिता रमाबाई यांचे योगदान

**सौरभ राजेश झेंडे**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रस्तावना:-**

१९ व्या शतकाच्या आरंभी भारतीय समाजामध्ये जातीसंस्था, अस्पृश्यता या अनिष्ट प्रथांचे जेवढे प्राबल्य होते, तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त जाचक सामाजिक व कौटुंबिक बंधनांचे पालन हिंदू स्त्रियांना करावे लागत होते. बालविवाह, पडदापद्धती, केशवपण, सतीप्रथा, जरठ-कुमारी विवाह इत्यादींमुळे स्त्रियांचे शोषण होत होते. महाराष्ट्रात या अनिष्ट व अन्यायकारी परंपरांवर अनेक समाजसुधारकांनी पाश्चात्य ज्ञानाने प्रेरित होऊन टीका करण्यास सुरुवात केली. त्यानंतर या व्यवस्थेत काही प्रमाणात बदल होत गेले. यातून नवविचार आणि आचारासाठी जनजागृती केली जाऊ लागली.

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात स्त्री उन्नतीसाठी कार्य केलेल्या समाजसुधारकांच्या यादीत केवळ 'ख्रिस्ती धर्म स्वीकारून' स्त्री उद्धाराचे कार्य केल्याने उपेक्षित किंवा काहीसे नजरेआड राहिलेले नाव म्हणजे पंडिता रमाबाई.रमाबाईंनी पाश्चात्य विद्या संपादन करून स्त्रियांना शिक्षित व स्वावलंबी करून जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. त्यांनी भारताबरोबरच परदेशातही आपल्या विद्वत्तेची कीर्ती गाजवून महाराष्ट्रातील स्त्रियांना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आपले सारे जीवन व्यतीत केले. म्हणूनच भारताच्या विशेष करून महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात त्यांनी केलेले सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे. त्यामुळे त्यांच्या या कार्यावर प्रकाश टाकने गरजेचे आहे.

- **पंडिता रमाबाईंचे पूर्वचरित्र (१९५८ ते १९२२):-**

पंडिता रमाबाईंचा जन्म २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अनंत शास्त्री तर आईचे नाव लक्ष्मीबाई. त्यांचा जन्म डोंगरे नावाच्या चित्पावन ब्राह्मण कुळात झाला. अनंत शास्त्री यांनी आपल्या पत्नी व मुलीला संस्कृत शिकवले म्हणून त्यांना छळ सोसावा लागला. गाव सोडल्यानंतर सर्व भारतभर तीर्थयात्रा करत १५-१६ वर्षांनी हे कुटुंब मद्रास इलाख्यात आले. पण मद्रास प्रांतात महाभयंकर दुष्काळ पडला होता. या दुष्काळात रमाबाईंचे आई-वडील व थोरली बहीण मृत्युमुखी पडले. रमाबाई व त्यांचा थोरला भाऊ प्रवास करत कोलकाता शहरात आले. तेथेच त्या दोघांच्या विद्वतेचे सार्थक झाले. कोलकता शहरातील ब्राह्मो समाजाचे पुढारी व कोलकाता विश्वविद्यालयातील पंडितांनी त्यांची कदर करून त्यांना सन्मानाने विद्यापीठात निमंत्रण दिले. रमाबाईंना "पंडिता" व "सरस्वती" हे बिरूद दिले.

- **रमाबाईंचा विवाह व वैधव्य:-**

रमाबाईंनी आपल्या बंधूचे मित्र विपिन बिहारीदास मेधावी या बंगाली शूद्र समाजातील वकिलाशी विवाह केला.१ हा विवाह आंतरप्रांतीय, आंतरजातीय, आणि विशेष म्हणजे प्रतिलोम होता. १८८० च्या काळात हे कट्टर सनातनींना रूचणारे नसल्याने अनेकांची मने त्यांच्याविषयी कलुषित झाली. दुर्दैवाने विवाहानंतर दीड वर्षाच्या आतच कॉलराने मेधावीचा मृत्यू झाला. त्यानंतर आपली कन्या मनोरमा हिच्या सोबत रमाबाई महाराष्ट्रात आल्या.२ पुणे व त्याचा परिसर हीच त्यांची कर्मभूमी ठरली. पंडिता रमाबाईंचा पुण्यास येण्याचा हेतू इंग्रजी शिकण्याचा होता. स्वतः त्यांनी इंग्रजीचा अभ्यास खाजगी रीतीने सुरू केला होता. पंडिता रमाबाई या उत्तम वक्त्या होत्या. विषय प्रतिपादन करण्याची त्यांची शैली उत्तम होती.

- **आर्य महिला समाजाची स्थापना:-**

१८८२ मध्ये रमाबाई पुण्यात आल्या. तेथे त्यांची जाहीर पुराणे व व्याख्याने होत. त्यांच्या निर्भय व विद्वतापूर्ण वक्तव्यामुळे स्त्रियांची निंदा करणाऱ्या अनेक टवाळ पुणेकरांनी त्यांच्यापुढे नांगी टाकली.३

स्त्रीस समाजाच्या सर्वांगीण उन्नतीच्या हेतूने ३० एप्रिल १८८२ रोजी त्यांनी पुण्यात व ३० नोव्हेंबर १८८२ रोजी मुंबईत 'आर्य महिला समाज' स्थापन केला. शिवाय सोलापूर, पंढरपूर, अहमदनगर, बार्शी येथे ही आर्य महिला समाज स्थापनेत त्या यशस्वी झाल्या. तरीही महाराष्ट्रातील स्त्रियांनी त्यांना तितकासा पाठिंबा दिला नाही.४

स्त्रियांचे ज्ञान वाढवावे, स्त्रियांना कोणत्याही विषयाचा विचार करण्याची व आपले विचार बोलून दाखवण्याची सवय लागावी. नीती, सन्मार्ग व धर्म यांचा सामान्य बोध व्हावा,एकूण स्त्रियांची स्थिती सुधारावी हा आर्य महिला समाज स्थापनेचा हेतू होता.

- **हंटर कमिशन समोर साक्ष:-**

दि.३ फेब्रुवारी १८८२ रोजी देशातील शालेय शिक्षणाची स्थिती अभ्यासण्यासाठी हंटर कमिशन भारतात आले. या समितीचे अध्यक्ष सर विल्यम हंटर होते. म्हणून या समितीला हंटर कमिशन असे म्हणत. पंडित रमाबाईंनी या समितीपुढे मराठी भाषेतून साक्ष दिली. रमाबाईंनी आपल्या साक्षमध्ये पुढील मुद्द्यांचा समावेश केला होता.

१) शिक्षण मातृभाषेतून असावे परंतु शाळेत इंग्रजी शिकवावी.
२) मुलीच्या शाळेत स्त्री शिक्षिकाच असाव्यात.
३) मुलीच्या शाळेची पाहणी करण्यासाठी पुरुषा ऐवजी स्त्री निरीक्षक नेमाव्यात.
४) मुलीच्या वर्तनावर लक्ष असावे.
५) स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण देण्याची सोय करावी.

या साक्षीमुळे सरकार दरबारी पंडिता रमाबाईंचे वजन वाढले. पंडिता रमाबाईंच्या साक्षीचे इंग्रजी भाषांतर सर हंटर यांनी करवुन घेतले. हे भाषण व्हिक्टोरिया राणीच्या वाचनात येऊन स्त्रियांचे वैद्यकीय शिक्षण, स्त्रियांसाठी दवाखाने आदी बाबतीत प्रत्यक्ष निर्णय घेतले गेले.५

- **शारदा सदन स्थापनेची कल्पना:-**

इ.स १८८१ च्या शिरगणतीनुसार भारताची लोकसंख्या २०कोटी होती. विधवा स्त्रियांची लोकसंख्या २.३० कोटी एवढी होती व त्यातही बालविधवांचे प्रमाण जास्त होते. विधवांचे हे प्रमाण व बालविधवांची संख्या पाहून पंडिता रमाबाईंचे मन चिंतीत झाले. त्यांनी स्त्रियांच्या व विशेषता अनाथ दुर्दैवी स्त्रियांच्या सेवेला वाहून घेण्याचे ठरविले व त्यासाठी त्यांनी पुणे,मुंबई, अहमदनगर येथील पुढारी व धनिकांच्या भेटी घेतल्या. संस्था काढण्याचा विचार बोलून दाखविला त्याला पण प्रतिसाद मिळाला नाही.

- **ख्रिश्चन धर्माचा स्वीकार व इंग्लंडमध्ये वास्तव्य:-**

शेवटी डॉक्टर व्हायचे व माया बहिणींची सेवा करायची असा विचार करून त्या इंग्लंडला गेल्या. आपली २ वर्षांची कन्या घेऊन त्या बोटीने इंग्लंडला १७ मे १८८३ रोजी पोहोचल्या. तेथे त्यांनी ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली. पंडिता रमाबाई यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याची बातमी येताच सर्वत्र खळबळ उडाली. ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यापूर्वीच ४ वर्ष त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केला होता.

- **रमाबाईचे अमेरिकेतील वास्तव्य:-**

१७ फेब्रुवारी १८८६ रोजी पंडिता रमाबाईंनी इंग्लंड सोडले व ६ मार्च १८८६ रोजी त्या अमेरिकेला पोहोचल्या. ११ मार्चला त्या आनंदीबाई जोशींच्या पदवीदान समारंभास हजर होत्या. इंग्लंड प्रमाणे अमेरिकेत गेल्यावरही तेथील स्त्रियांनी केलेली प्रगती, स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियांचा सामाजिक दर्जा पाहून त्या आश्चर्यचकित झाल्या. अमेरिकन संस्था तेथील स्त्रिया,चर्च,शिक्षण आदींचा अत्यंत बारकाईने व सर्व बाजूंनी रमाबाईंनी अभ्यास केला.

- **रमाबाई असोसिएशनची स्थापना:-**

अमेरिकेतील स्त्री-पुरुषात रमाबाईंनी हिंदुस्थानाच्या बालविधवांबद्दल इतकी कमालीची सहानभूती उत्पन्न केली की त्यांच्या कार्याला मदत करण्यासाठी 'रमाबाई असोसिएशन' नावाची संस्था काढण्यात आली. या संस्थेमार्फत पैसा गोळा करून

भारतात त्यांनी शारदा सदन शाळेची स्थापना केली. इ.स १८९८ मध्ये रमाबाई पुन्हा अमेरिकेला गेल्या. तेव्हा त्यांनी एक सभा घेऊन जुने अधिकार मंडळ बरखास्त केले. अन् नवीन अधिकार मंडळ निर्माण केले. ऑगस्ट १८९८ मध्ये अमेरिकन रमाबाई असोसिएशन असे संस्थेचे नाव परिवर्तन केले. पूर्वी शारदा सदन ही संस्था सर्व धर्मातील स्त्रियांसाठी कार्य करत होती. आता ही संस्था फक्त ख्रिस्ती संस्था म्हणून काम करेल असे धोरण ठरवण्यात आले.

- **शारदा सदन संस्थेच्या कार्यातील योगदान:-**

इ.स १८८९ च्या फेब्रुवारीत पंडिता रमाबाई अमेरिकेहून कोलकात्याला आल्या. मुंबईत त्यांनी ११ मार्च १८८९ रोजी विल्सन कॉलेजच्या जवळ 'शारदा सदन' स्थापन केले. या शारदा सदनात पहिली मुलगी आली तिचे नाव शारदा गद्रे होते.६

नोव्हेंबर १८९० मध्ये शारदा सदन पुण्यास तर १८९२ मध्ये ते स्वतःच्या इमारतीत गेले. तेथे विरोधक शारदा सदन यशस्वी होऊ देणार नाहीत असे हितचिंतकांचे म्हणणे होते, पण रमाबाईंना लोकमतापेक्षा मुलींच्या कल्याणाचा ध्यास जास्त होता.७

पुण्यात आल्यावर सदनात ६४ विद्यार्थिनी झाल्या. यामध्ये दुर्गाबाई किर्लोस्कर, वेणूबाई नामजोशी,काशीबाई देवधर यांचा समावेश होता. या तिघींनीही पुढे हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रमात काम केले.८

- **शारदा सदनातील स्त्रिया:-**

शारदा सदनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे येणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या स्वभावाची व सवयींची संपूर्ण माहिती मिळवून तिच्याविषयी पूर्ण खात्री पटल्याशिवाय रमाबाई तिला इतर आश्रमवासीयांमध्ये मिसळू देत नसत. कारण प्रत्येक स्त्री ही वेगवेगळया संस्कार,अनुभव व हालअपेष्टातून तेथे आलेली असे. काही सासरच्या अमानुष छळाला कंटाळलेल्या, काही अंधश्रद्धा व परंपरागत रुढीने त्रस्त तर काही पातकी पुरुषांच्या अत्याचारास बळी पडलेल्या बालविधवा व स्त्रिया आश्रमात होत्या.९

सर्वात महत्त्वाचे म्हणजे परिस्थितीने पातकी पुरुषाच्या बळजबरीस बळी पडलेल्या स्त्रियांना सन्मार्गावर आणण्यासाठी त्यांनी कडेगावला मिस एडमंड यांच्या सहाय्याने उद्धारगृहाची (**Rescue Home**)स्थापना केली.१०

- **संमती वयाच्या विधेयकास पाठिंबा:-**

इ.स १८९१ मध्ये समती वयाच्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. त्यातील तरतूद अशी होती की संभोगावेळी मुलीचे वय १२ वर्षांपेक्षा कमी नसावे. पूर्वीच्या कायद्यात ही वयोमर्यादा १० वर्षांची होती. या विधेयकाच्या बाबतीत धार्मिक नियम मोडल्याचे वादन सुरू झाले. त्या काळात महाराष्ट्रात महिलांना घराबाहेर पडण्याची परवानगी नव्हती. कोणत्याही सभेला, सांस्कृतिक कार्यक्रमाला जाण्याची मुभा नव्हती.११ तरीही संमती वयाच्या नवीन कायद्यासाठी ही चळवळ २ वर्ष चालली. महाराष्ट्रात टिळक पक्षाने या कायद्यास विरोध दर्शवला. रमाबाईंचे जीवन धार्मिकता व सामाजिकता लक्षात घेण्यासाठी खूप महत्त्वाच आहे. महाराष्ट्रातील सुधार चळवळ म्हणून आजही त्यांच्याकडे पाहिले जाते.१२

- **पंडिता रमाबाईंची इतर कामे :-**

1) हिंदी राष्ट्रभाषा असावी- "युनायटेड स्टेट्सची लोकस्थिती व प्रवासवर्णन" या ग्रंथात पंडिता रमाबाईनी हिंदी राष्ट्रभाषा असावी असे आग्रहाने म्हटले आहे. कॉंग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात इंग्रजीतुनच व्याख्याने होतात, ठराव पास केले जातात याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

2) मद्यपान निषेधक स्त्री मंडळ:- या मंडळाच्या रमाबाई सक्रिय सदस्य होत्या. त्यांनी या चळवळीत अमेरिकेत असतानाचा भाग घेतला होता. भाषणे दिली.

3) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या ५ व्या अधिवेशनात सहभाग:- इस १८८९ मध्ये मुंबईच्या कॉंग्रेस अधिवेशनाला ८ स्त्री प्रतिनिधी होते. त्यापैकी ४ स्त्री प्रतिनिधी आर्य महिला समाजाच्या होत्या, तर ४ मध्यपान निषेधक स्त्री मंडळाच्या होत्या. या दोन्ही संस्था रमाबाईंच्या नेतृत्वाखाली काम करत होत्या.

4) सामाजिक परिषदेतील सहभाग:- काँग्रेस बरोबरच व त्याच मंडपात सामाजिक परिषद भरत असे. मुंबई काँग्रेसचे अधिवेशन संपताच त्याच मंडपात सामाजिक परिषद भरत असे. २९ डिसेंबर १८८९ रोजी तिसरी सामाजिक परिषद भरली. परिषदेत विधवा केशवपणास बंदी असावी असा ठराव श्री सुब्रह्मण्यम अय्यर यांनी मांडला. पंडित रमाबाईंनी त्याच अनुमोदन देणारे भाषण केले होते.

5) मध्यप्रदेश / गुजरात दुष्काळग्रस्तांना मदत:- इ.स. १८९७ मध्ये मध्य प्रदेशातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केला. तेथील स्थिती पाहून त्या दुःखी झाल्या. तिथे त्यांनी रिलिफ कॅम्प उभारले व त्याचबरोबर ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराचेही काम केले. त्यांनी शेकडो मुलींना ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली.

6) कडेगाव येथे मुक्ती सदन, कृपासदन व प्रीतिसदन स्थापना:-

कडेगाव येथे २००० माणसे बसू शकतील एवढे उपासना मंदिर आहे. बाजूलाच एक दवाखाना आहे. तेथे विहिरी खोदून मुबलक पाण्याची सोय केली आहे. कृपासदनामध्ये पाऊल वाकडे पडलेल्या व जगास तोंड दाखवण्यास जागा नाही अशा स्त्रियांना आश्रय दिला जातो. प्रीतिसदनात वृद्ध,अशक्त, लंगडे व लुळे यांना आश्रय दिला जातो. आंधळयांसाठी 'बार्तमी सदन' आहे.

- **वाङ्मय:-**

पंडिता रमाबाई यांनी विधवा व इतर स्त्रियांसाठी कार्य करताना स्त्रियांच्या व्यथा मांडणारी व स्त्रियांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण वाङ्मय निर्मिती पण केली.

त्यांनी स्त्री धर्मनिती (१८८२), इंग्लंडचा प्रवास, द हाय कास्ट हिंदू वुमन (१८८७), युनायटेड स्टेटसची लोकस्थिती व प्रवासवृत्त (१८८९) व बालोद्यान शिक्षण पद्धतीची पुस्तके लिहिली. त्यांनी ग्रीक व हिब्रू भाषेतून बायबलचे मराठीत भाषांतर केले. या वाङ्मयाकडे पाहून देवदत्त नारायण टिळक रमाबाईंच्या बाबत म्हणतात, "पंडिता रमाबाई इतके व्रतस्थ राहण्याचे महात्मा गांधी खेरीज अलीकडे क्वचित कोणा हिंदी पुढाऱ्यास साधले असेल."१३

- **रमाबाईंच्या कार्याचा परिणाम:-**

रमाबाईंच्या कार्याचा परिणाम भारताबरोबरच प्रदेशातही मोठ्या प्रमाणात झाला होता असे दिसून येते. रमाबाईंच्या कार्याचा परिणाम यवनद्वीपच्या कार्टिनी या राज्यकन्येवर झाला. तिने फ्रेंच वर्तमानपत्रातून रमाबाईंच्या कार्याविषयी वाचले. यातूनच आपल्या देशातही स्त्रियांची प्रगती व्हावी ह्या कल्पनेने तिने युरोपात पत्र मैत्रिणी मिळवल्या. परिणामी तिच्या प्रयत्नाने तिथे स्त्री शिक्षणास सुरुवात झाली. तीने आपल्या पत्रसंग्रहामध्ये आपल्याला या कार्याची प्रेरणा पंडिता रमाबाईंकडून प्राप्त झाल्याचे तिने म्हटले आहे.१४

शेवंतिकाबाई निकंबे यांनी मुंबईच्या शारदा सदनात काम केले होते. हे सदन पुण्यास आल्यावर त्यांनी उच्चवर्णीय विधवा, गृहिणी व कुमारीकांसाठी मुंबईत एक शाळा काढली. सुंदराबाई पवार, मिसेस हेलन डायर व मिसेस अल्फ्रेड डायर आणि मिसेस ज्युडिथ अँड्रयुज हे सदैव रमाबाईचे हितचिंतक व पाठीराखे राहिले. याशिवाय रमाबाईंच्या कार्यास मदत करण्यासाठी बऱ्याच इंग्लंड, अमेरिका, न्यूझीलंड इत्यादी देशातील स्त्रियांनी आपले आयुष्य वेचले. ह. म. घोडके पंडिता रमाबाईंच्या कार्याचे वर्णन करताना म्हणतात की "भारतात स्त्री मुक्ती चळवळ पंडिता रमाबाईंनी शून्यातून उभी केली. त्या भारतातील स्त्री मुक्ती चळवळीच्या आघ प्रवर्तक आहेत."१५

- **समारोप:-**

देशाच्या प्रबोधन चळवळीत अनेक महिलांनी प्रकर्षाने भाग घेऊन सामाजिक सुधारणेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तरी त्यांच्या कार्याचे मोल भारतीयांना आणि विशेषतः रमाबाईंनी ज्या महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानले त्या महाराष्ट्र जनतेला फार उशिरा उमगले. भारतापेक्षा परदेशात रमाबाईंची कीर्ती खूप मोठ्या प्रमाणावर पसरल्याने अनेक विदेशी स्त्रियांनी त्यांच्या कार्यात आपले आयुष्यखर्ची घातले. पण आयुष्याच्या पूर्वार्धात मिळवलेल्या संस्कृतच्या ज्ञानाचा उपयोग मात्र रमाबाईंना

त्यांच्या कार्यासाठी करता आला नाही. तरी पण त्याच्या कार्याचा एकंदरीत आढावा हे स्पष्ट करतोय की, कोणीही किती पण टीका केली असली तरी त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. पंडिता रमाबाई खऱ्या अर्थाने एक लोकोत्तर स्त्री होत्या.

भारताच्याच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांनाही पंडिता रमाबाई विषयी खूप अत्यल्प माहिती आहे. या तेजस्वी स्त्रीच्या कार्याची ओळख व अनुकरण काळाची गरज आहे. पण केवळ ख्रिश्चन धर्म स्वीकारून हे कार्य केल्याने त्या 'उपेक्षित' राहिल्या असे म्हणावे लागेल.

- **संदर्भसूची :-**

१) देवदत्त नारायण टिळक, महाराष्ट्राची तेजस्विनी, पंडिता रमाबाई, नागरिक, नाशिक, १९६० पृष्ठ २-३

२) दे.ना.टिळक उपरोक्त पृष्ठ ३

३) प्र.के.अत्रे, मराठी माणसे, मराठी मने, परचुरे, मुंबई १९७२ पृष्ठ ३

४) दे.ना. टिळक, उपरोक्त पृष्ठ १०१-१०२

५) दे.ना.टिळक, उपरोक्त पृष्ठ ११०

६) धोंडो केशव कर्वे,आत्मवृत्त, वामन मल्हार जोशी, हिंगणे,१९२८ पृष्ठ १५८

७) दे.ना. टिळक, उपरोक्त पृ २२४

८) धो.के.कर्वे, उपरोक्त पृष्ठ २५८ व २६०

९) दे.ना. टिळक, उपरोक्त पृष्ठ २३४-२३५, २३९-२४०

१०) दे.ना. टिळक, उपरोक्त पृष्ठ ४३४-४३५

११) चौधरी के के,'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड-१' महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई प्रथम आवृत्ती२०१५

१२) खटलर कलेमेटिना, 'पंडिता रमाबाई सरस्वती' अमेरिकन रमाबाई असोसिएशन, न्यूयॉर्क प्रथम आवृत्ती १९२२, पृष्ठ ३६

१३) देवदत्त नारायण टिळक- 'महाराष्ट्राची तेजस्विनी पंडिता रमाबाई'

१४) दे.ना. टिळक, उपरोक्त पृष्ठ २३२- २३३

१५) ह.म घोडके- 'महाराष्ट्र गाथा भाग -२'